MHWS070027692017

दाखल दिनांक : ११/१२/२०१७
नोंदणी दिनांक : ११/१२/२०१७
न्यायनिर्णय दिनांक : १७/०३/२०२६
कालावधी : ०८वर्ष०३ म.०६ दि.

**कारंजा येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, यांचे न्यायालयात**

(पिठासीन अधिकारी : पी. डी. देवरे)

# न्यायनिर्णय

(दिनांक १७ मार्च २०२६ ला घोषित)

**नि.फौ ख.क्र. २२०/२०१७** **निशाणी क्र. ११९**

**भाग – अ**

| | |
|---|---|
| | प्रथम खबर अहवाल / गुन्हा व पोलीस ठाणे तपशील |
| **अभियोग पक्ष** | महाराष्ट्र शासन द्वारा<br>कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशन,<br>ता. कारंजा (लाड), जि. वाशिम.<br>गु.र. न.७५/२०१७ |
| **अभियोग पक्षाचे मा. विधीज्ञ** | सहा. सरकारी अभियोक्ता – श्री. एन. डब्ल्यु. सबरदंडे. |
| **आरोपी** | **१. बाबाराव मनोहर गोडसे** |

| | |
|---|---|
| | वय : ६६ वर्ष,व्यवसाय :शेती,<br>**२. प्रभाकर मनोहर गोडसे**<br>वय : ५७ वर्ष, व्यवसाय:शेती,<br>**३. निखील प्रभाकर गोडसे**<br>वय : २९ वर्ष, व्यवसाय:शेती,<br>**४. मंगेश बाबाराव गोडसे**<br>वय : २९ वर्ष, व्यवसाय:शेती,<br>**५. राजेश बाबाराव गोडसे**<br>वय : ३२ वर्ष, व्यवसाय:शेती,<br>सर्व रा. मोखड, ता. कारंजा जि. वाशिम |
| **आरोपींचे मा. विधीज्ञ** | श्री. ए. ए. खंडागळे |

**भाग 'ब'**

| | |
|---|---|
| **गुन्हयाचा दिनांक** | ०८/०९/२०१७ |
| **प्रथम खबर अहवाल दिनांक** | ०९/०९/२०१७ |
| **दोषारोपपत्र दिनांक** | ११/१२/२०१७ |
| **दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक** | २६/०३/२०२१ |
| **पुरावा सुरु झाल्याचा दिनांक** | ०४/१०/२०२२ |
| **न्यायनिर्णयास राखीव ठेवल्याचा दिनांक** | --- |
| **न्यायनिर्णय घोषित केल्याचा दिनांक** | १७/०३/२०२६ |
| **शिक्षा दिल्याचा दिनांक, असल्यास** | लागू नाही |

## आरोपींची माहिती

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक केल्याचा | जामीनावर सुटल्याचा | दोषारोप कलम | निर्दोषमुक्त / शिक्षा | दिलेली शिक्षा | फौजदारी प्रक्रिया |
|---|---|---|---|---|---|---|---|

| | | दिनांक | दिनांक | | | | संहिता कलम ४२८ नुसार खटल्याकामी आरोपीचा असलेला न्यायाधीन बंदी कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | **बाबाराव मनोहर गोडसे** | फौ.प्र.सं. कलम ४१(१) नुसार नोटिस व समजपत्र | – | कलम १४३, १४८, ३२४, ५०४, ५०६ सह कलम १४९ भा.द.वि. | निर्दोष | निरंक | निरंक |
| २. | **प्रभाकर मनोहर गोडसे** | फौ.प्र.सं. कलम ४१(१) नुसार नोटिस व समजपत्र | – | वरीलप्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |
| ३. | **निखील प्रभाकर गोडसे** | फौ.प्र.सं. कलम ४१(१) | – | वरीलप्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | नुसार नोटिस व समजपत्र | | | | | |
| ४. | **मंगेश बाबाराव गोडसे** | फौ.प्र.सं. कलम ४१(१) नुसार नोटिस व समजपत्र | – | वरीलप्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |
| ५. | **राजेश बाबाराव गोडसे** | फौ.प्र.सं. कलम ४१(१) नुसार नोटिस व समजपत्र | – | वरीलप्रमाणे | निर्दोष | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय

(दिनांक १७ मार्च २०२६ ला घोषित)

१. सदरचा खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड विधानाचे कलम १४३, १४८ ३२४, ५०४ व ५०६ सह कलम १४९ अन्वये गुन्हयासाठी न्यायचौकशीस आहे.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकिकत खालीलप्रमाणे –**

२. फिर्यादी वासुदेव अरुण गोडसे हे मोखड, ता. कारंजा येथे त्यांच्या कुटुंबासह राहतात व मजुरीचे काम करतात. आरोपी हे देखील त्यांच्या घराजवळच राहतात.

३. दिनांक ०८/०९/२०१७ रोजी संध्याकाळी फिर्यादी घरी गेल्यानंतर त्यांची बहिण मुक्ता हिने त्यांना सांगितले की, 'मंदाबाई, बाबाराव, मंगेश गोडसे यांनी पाण्याच्या कारणावरुन तिच्याशी भांडण केले.' त्यामुळे फिर्यादी व मुक्ता मोटरसायकलवरुन पोलीस स्टेशनला गेले व मंदाबाई, बाबाराव व मंगेश यांचेविरुध्द फिर्याद दिली. रात्री १०.०० वाजेच्या सुमारास पोलीस स्टेशनमधून गावात परत आल्यानंतर ते त्यांच्या घराजवळ असताना सर्व आरोपी तेथे आले. आरोपींनी फिर्यादीला 'तु रिपोर्ट का दिला?' असे म्हणून शिवीगाळ केली. राजेशने त्यांच्या डोक्यावर कुऱ्हाड मारली. प्रभाकरने काठीने पायावर मारले. त्यामुळे त्यांचा पाय फ्रॅक्चर झाला. मंगेशने त्यांना काठीने मारहाण केली. फिर्यादीचे वडिल अरुण हे त्यांना सोडवण्यासाठी आले असता निखीलने काठीने अरुणच्या डोक्यावर मारले. बाबाराव व मंगेश यांनी अरुण यांना काठीने हातावर मारहाण केली. त्यामुळे त्यांचा डावा हात फ्रॅक्चर झाला. फिर्यादीची बहिण मुक्ता बाहेर येवून त्यांना सोडवित असताना आरोपी प्रभाकर, बाबाराव, निखील व मंगेश यांनी मुक्ताला देखील काठीने कंबरेवर, हातावर व पायावर मारहाण केली. फिर्यादीची आई दुर्गाबाई घरातून बाहेर येवून भांडण सोडवित असताना बाबाराव, प्रभाकर व निखील यांनी तिलादेखील काठीने मारहाण केली. दिनकर व शरद यांनी त्यांचे भांडण सोडविले. ॲपे रिक्षा चालक शेख अखील, रंजीत सावळे व रविंद्र मानेकर यांनी फिर्यादी, त्यांचे वडिल अरुण, आई दुर्गा व बहिण मुक्ता यांना रिक्षात टाकले व पोलीस स्टेशनला नेले. तेथे फिर्यादीने कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशनला वरील घटनेबाबात फिर्याद दिली.

४. सदरच्या फिर्यादीवरुन कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. ७५/२०१७ भा.दं.वि. १४३, १४८, ३२४, ५०४ व ५०६ सह कलम १४९ नुसार गुन्हा नोंदविण्यात आला. त्यानंतर तपासी अंमलदार कैलास राठोड, पो.हे.कॉ. यांनी प्रकरणाचा पुढील तपास पूर्ण करुन वरील कलमान्वये आरोपींविरूध्द अंतिम अहवाल न्यायालयात दाखल केला.

५. सदर खटल्यात माझे पुर्वाधिकारी यांनी निशाणी क्र.३१ वर आरोपींचे भा.द.वि. कलम १४३, १४८, ३२४, ५०४ व ५०६ सह कलम १४९ करिता गुन्हयाचे निवेदन नोंदविले. आरोपींनी त्यांचे निवेदन नि. क्र. ३२ ते ३६ नुसार गुन्हा नाकबूल करून संपरिक्षेची तयारी दर्शविली.

६. आरोपींवरील आरोप शाबित करण्यासाठी अभियोगपक्षाने न्यायनिर्णयाच्या भाग–क मधील साक्षीदारांची साक्ष नोंदविली.

७. आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ३१३ प्रमाणेचे स्पष्टीकरणात्मक निवेदन निशाणी क्र. १०८ ते ११२ लगत नोंदविण्यात आले. आरोपींचा असा बचाव आहे की, त्यांचे व फिर्यादीच्या कुटुंबाचे आधीपासूनच वाद असल्यामुळे त्या रागातून फिर्यादीने त्यांच्या विरुध्द खोटा रिपोर्ट दिला. आरोपी त्यांच्या घरासमोर येवून त्यांच्याशी वाद करत होते. त्यावेळी ते रस्त्यावर पडून त्यांना दुखापती झाल्या. आरोपींनी त्यांचे बचावाकरीता कोणताही साक्षीदार तपासला नाही.

८. अभियोगपक्षाकरिता मी मा. सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. एन. डब्ल्यु. सबरदंडे यांचा व आरोपींकरीता मा. विधीज्ञ श्री. ए. ए. खंडागळे यांचा युक्तिवाद ऐकला.

९. अभियोगपक्षाचा साक्षीपुरावा व बचावपक्षाच्या वतीने करण्यात आलेले युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझे निर्णयाकरिता येतात. त्यावरील निष्कर्ष कारणांसह मी खालील प्रमाणे देत आहे.

| **अ.क्र** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | अभियोगपक्ष शाबीत करतो काय की, दिनांक ०८/०९/२०१७ रोजी २२.०० वाजताचे सुमारास मोखड, ता. कारंजा, जि. वाशिम येथे आरोपींनी गैरकायदयाचा जमाव जमवून त्या जमावाचा उद्देश साध्य करण्यासाठी काठया व कुऱ्हाड अशा प्राणघातक शस्त्रांनी सज्ज होवून दंगल घडवली व भारतीय दंड संहितेचे कलम १४३, १४८ अन्वये गुन्हा केला? | **नाही.** |
| **२.** | अभियोगपक्ष शाबीत करतो काय की, वरील नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरकायदयाचा जमाव जमवून त्या जमावाचा उद्देश साध्य करण्यासाठी काठया व कुऱ्हाड अशा | |

| | | |
|---|---|---|
| | प्राणघातक शस्त्रांनी फिर्यादी, त्याचे आई–वडिल व बहिण यांना मारहाण करुन इच्छापूर्वक दुखापत पोहचविली म्हणून भारतीय दंड संहितेचे कलम ३२४ सह कलम १४९ अन्वये गुन्हा केला? | **नाही.** |
| ३. | अभियोगपक्ष शाबीत करतो काय की, वरील नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरकायदयाचा जमाव जमवून त्या जमावाचा उद्देश साध्य करण्यासाठी फिर्यादी, त्याचे आई–वडिल व बहिण यांचेकडून सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा अन्य कोणताही अपराध घडावा या उद्देशाने त्यांना शिवीगाळ केली व अपमान करुन त्यांना प्रक्षोभित केले व भारतीय दंड संहितेचे कलम ५०४ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा केला? | **नाही.** |
| ४. | अभियोगपक्ष शाबीत करतो काय की, वरील नमुद दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपींनी गैरकायदयाचा जमाव जमवून त्या जमावाचा उद्देश साध्य करण्यासाठी फिर्यादी, त्याचे आई–वडिल व बहिण यांना फौजदारीपात्र धाकदपटशा करत दहशत निर्माण केली व भारतीय दंड संहितेचे कलम ५०६ सह कलम १४९ प्रमाणे गुन्हा केला? | **नाही.** |
| ५. | आदेश काय? | **आरोपींना निर्दोष मुक्त करण्यात आले.** |

## !! का र ण मी मां सा !!

**मुद्दा क्र. १ ते ४ बाबतः–**

१०. भारतीय दंड विधान कलम १४३, १४८, ३२४, ५०४ व ५०६ सह कलम १४९ नुसार आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाला हे सिध्द करणे आवश्यक आहे की, आरोपींनी गैरकायदयाचा जमाव जमवून, मृत्यु होवू शकेल असे घातक शस्त्र किंवा वस्तू बाळगून जमावाचा उद्देश साध्य करण्याकरिता फिर्यादी व साक्षीदारांना काठया व कुऱ्हाडीने दुखापती केल्या व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वरील सर्व मुद्यांवरील

अभियोगपक्षाचा पुरावा एकत्रित असल्यामुळे मी सर्व मुद्दयांचे विवेचन सोबतच करत आहे.

११. फिर्यादी, त्याचे आई–वडिल व बहिण यांना झालेल्या जखमा शाबीत करण्यासाठी अभियोगपक्षाने साक्षीदार क्र. ०९ डॉ. चव्हाण, वैद्यकिय अधिकारी यांची साक्ष नोंदविली. त्यांच्या पुराव्यात त्यांनी सांगितले की, दिनांक ०८/०९/२०१७ रोजी सुनील, पो.कॉ./१७१ यांनी नि.क्र. १०० व १०१ वरील मेमोसह फिर्यादी वासुदेव, फिर्यादीचे वडिल अरुण, बहिण मुक्ता व आई दुर्गा यांना वैद्यकीय तपासणीसाठी ग्रामीण रुग्णालय, कारंजा येथे आणले होते. त्यावेळी त्यांनी सा. क्र. ०२ अरुण, फिर्यादीचे वडिल यांची वैद्यकीय तपासणी केली असता त्यांना त्यांच्या शरिरावर ०१. डोक्याच्या मागील बाजुस टाळूच्या भागावर ३ से. मी. खरचटलेली दुखापत, ०२) डाव्या हाताच्या पाठीमागील भागावर १० से.मी. X ५ से.मी. X २.५ से.मी. सुज असलेली व ०३) नाकाच्या हाडावर खरचटलेली २ से.मी. X १ से.मी. ची जखम अशा तीन दुखापती आढळून आल्या. पहिल्या दोन दुखापती एक ते दोन तासाच्या आतील व कठीण आणि टणक वस्तूमुळे व तिसरी दुखापत अर्धटणक वस्तुमुळे झाल्याचे दिसून आले. पहिली व तिसरी दुखापत साध्या होत्या. दुसऱ्या दुखापतीसाठी त्यांनी सदर रुग्णाची क्ष–किरण तपासणी करण्याचा सल्ला दिला.

१२. त्यानंतर त्यांनी फिर्यादी वासुदेव यांची वैद्यकीय तपासणी केली असता त्यांना फिर्यादीच्या शरिरावर डोक्याच्या डाव्या पारिएटल भागावर अनियमित पृष्ठभाग व कडा असलेली व तिच्याभोवती सुज ६ से.मी. X १ से.मी. X ०.५ से.मी. असलेली जखम व ०२) डाव्या मनगाटावर ६ से.मी. X ०.६ से.मी. ची सुज असल्याचे अशा दोन दुखापती आढळून आल्या. सदरच्या दुखापती एक ते दोन तासाच्या आतील होत्या. पहिली दुखापत साधी होती. दुसऱ्या दुखापतीसाठी त्यांनी फिर्यादीला क्ष–किरण तपासणी करण्याचा सल्ला दिला.

१३. त्यानंतर त्यांनी फिर्यादीची आई दुर्गा यांची वैद्यकीय तपासणी केली असता त्यांना दुर्गाच्या शरिरावर उजव्या हातावर सुज–निळसर जखम (मारामुळे झालेली ) ३ से.मी. X ३ से.मी., ०२) उजव्या तळहातावर ५ से.मी. X ०.५ से.मी. ची सुज असल्याचे व ०३) पाठीच्या उजव्या बाजुस, खांदयाच्या पाठीमागील हाताच्या आतील भागावर आघाताची जखम (बोथट वस्तुच्या आघातामुळे) अशा तीन दुखापती आढळून आल्या. सदरच्या दुखापती चार

ते पाच तासाच्या आतील व कठीण आणि टणक वस्तूमुळे झाल्याचे दिसून आले. सर्व दुखापती या साध्या होत्या.

१४. त्यानंतर त्यांनी फिर्यादीची बहिण मुक्ता यांची वैद्यकीय तपासणी केली असता त्यांना मुक्ताच्या शरिरावर दोन्ही मांडयांवर सौम्य स्वरुपाची सुज, ज्यामध्ये वेदना होत असलेली व चालण्यास असमर्थता निर्माण झालेली अशी एक दुखापत आढळून आली. त्यांनी सदर रुग्णाची क्ष–किरण तपासणी करण्याचा सल्ला दिला. त्यामुळे त्यांनी सुनिल, पो.कॉ./१७१ यांना नि.क्र. १०२ ते १०५ वरील सदर साक्षीदारांची वैद्यकीय तपासणी केल्याबाबतचे वैद्यकीय प्रमाणपत्र दिले.

१५. आरोपींतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासामध्ये त्यांनी मान्य केले की, एखादी व्यक्ती कठीण व टणक पुष्ठभागावर पडल्यास वैद्यकीय प्रमाणपत्र नि. क्र. १०२ ते १०५ मध्ये नमुद असलेल्या दुखापती होवू शकतात. मात्र त्यांनी फिर्यादी व साक्षीदारांची वैद्यकीय तपासणी केली नसल्याचा व पोलिसांच्या सांगण्यावरुन वैद्यकीय प्रमाणपत्र दिल्याचा आरोपींचा बचाव नाकारलेला आहे.

१६. वरील पुराव्यावरुन फिर्यादी व साक्षीदारांस नि. क्र. १०२ ते १०५ वरील वैद्यकीय प्रमाणपत्रातील नमूद दुखापती झाल्याचे स्पष्ट होते. आरोपींचा असा बचाव आहे की, आरोपींशी पटत नसल्यामुळे फिर्यादी वासुदेव, साक्षीदार अरुण, मुक्ता व दुर्गा भांडण करण्यासाठी आरोपींच्या घरी गेले असता वाद करताना फिर्यादी व वरील साक्षीदार हे सिमेंटच्या रोडवर पडल्यामुळे त्यांना दुखापती झाल्या. त्यामुळे वैद्यकीय प्रमाणपत्र नि. क्र. १०२ ते १०५ मध्ये नमूद दुखापतींना आरोपी कारणीभुत आहे किंवा नाहीत हे अभियोगपक्ष पुराव्याच्या आधारे शाबित करतो किंवा नाही हे बघणे महत्त्वाचे ठरते. त्यामुळे अभियोगपक्षाच्या पुढील पुराव्याचे विवेचन करतो.

१७. सा. क्र.०२ अरुण, फिर्यादीचे वडिल व जखमी यांच्या पुराव्यात असे आले आहे की, अंदाजे ०७ ते ०८ वर्षापूर्वी ८ सप्टेंबरला त्यांची मुलगी सा. क्र. ०६ मुक्ता नळावर पाणी भरत असताना आरोपींचे व मुक्ताचे भांडण झाले होते. त्याचा रिपोर्ट दिला होता. त्याच

दिवशी रात्री १०.०० ते ११.०० वाजता त्यांच्या घराजवळ आरोपींनी त्यांना, मुक्ताला, त्यांची पत्नी सा. क्र. ०८ दुर्गा व त्यांचा मुलगा सा. क्र. ०७ वासुदेव यांना काडयांनी (काठयांनी) व कुऱ्हाडीने मारहाण केली. आरोपी राजू याने वासुदेवला आर्टिकल–इ वरील कुऱ्हाडीने डोक्यात मारले व त्यांना आरोपी बाबाराव आणि प्रभाकर यांनी काठयांनी हातावर मारले. राजु आणि मंगेश यांनी दुर्गाला कंबरेवर काठ्यांनी मारले. आरोपींनी मुक्ताला काठ्यांनी मारले. त्यांना इलाजाकरिता अमरावती येथे नेण्यात आले. आरोपींनी घटनेच्यावेळी त्यांना मारहाण करण्यासाठी वापरलेल्या काठया व कुऱ्हाड या आर्टिकल–अ ते ड वरील काठया व आर्टिकल–इ वरील कुऱ्हाड असल्याचे त्यांनी ओळखले.

१८. या साक्षीदाराच्या उलटतपासात असे आले आहे की, घटना आरोपी प्रभाकरच्या घरासमोर घडली होती. त्यांचे घर आरोपींच्या घरापासून दोन तीन घराच्या अंतरावर आहे. घटनेच्यापूर्वी आरोपी व त्यांचे नळाच्या कारणावरुन पटत नव्हते. त्यांच्या व आरोपीच्या घरासमोर सिमेंट कॉक्रीटचा पक्का रोड आहे व रोडच्या पलिकडे सिमेंटच्या नाल्या आहे. आर्टिकल–अ ते ड वरील काठया व आर्टिकल–इ वरील कुऱ्हाड शेतकऱ्याच्या घरात सहज उपलब्ध असतात. तसेच आर्टिकल–अ ते ड वरील काठया खेडयात कुठेही सापडतात. आरोपींनीदेखील घटनेनंतर त्यांच्याविरुध्द रिपोर्ट दिला. याव्यतिरीक्त ते, वासुदेव, मुक्ता व दुर्गा आरोपींसोबत वाद करुन त्यांना मारहाण करण्यासाठी आरोपींच्या घरासमोर गेले होते, त्यावेळी आरोपींना मारहाण करताना ते सर्व सिमेंटच्या रस्त्यावर पडल्यामुळे त्यांना दुखापती झाल्याचा आरोपींनी त्यांना आर्टिकल–अ ते ड वरील काठया व आर्टिकल–इ वरील कुऱ्हाडीने कोणतीही मारहाण केली नसल्याचा व आरोपींशी त्यांचे पटत नसल्यामुळे वासुदेवने आरोपींविरुध्द खोटा रिपोर्ट दिल्याचा आरोपींचा बचाव त्यांनी नाकारलेला आहे. राजु आणि मंगेश यांनी दुर्गाला मारहाण केली हा मजकूर सदर साक्षीदाराने प्रथमतः न्यायालयासमोर सांगितलेला आहे. सदर मजकूर त्यांच्या पोलीस जबाबात नमूद नाही.

१९. सा. क्र. ०६ मुक्ता, फिर्यादीची बहिण व जखमी यांच्या पुराव्यात असे आले आहे की, दिनांक ०८/०९/२०१७ रोजी संध्याकाळी ०५.०० वाजताच्या दरम्यान मोखड येथे त्यांच्या घरासमोर नळाच्या पाण्यावरुन आरोपींशी त्यांचे भांडण झाले होते. त्या व त्यांचा

भाऊ वासुदेव पोलीस स्टेशनला गेले व त्यांनी पोलीस स्टेशनला सदर भांडणाचा रिपोर्ट दिला. त्यानंतर रात्री ०८.३० ते ०९.०० वाजेच्या दरम्यान ते घरी गेल्यानंतर वासुदेव मोटरसायकल उभी करत असताना सर्व आरोपींनी त्याच्याशी पोलीस स्टेशनला फिर्याद का दिली असे विचारुन भांडण केले. भांडणाचा आवाज आल्यामुळे त्या व सा. क्र. ०२ अरुण घराबाहेर गेले. त्यावेळी आरोपी राजेशने आर्टिकल–इ वरील कुऱ्हाडीने वासुदेवच्या डोक्यात मारले होते व वासुदेव खाली पडलेला होता. प्रभाकर, निखील व बाबाराव यांनी अरुणला काठीने मारहाण केली. आरोपी निखीलने अरुण यांना खांदयावर मारले. त्या भांडण सोडवायला गेल्या असता बाबाराव, निखील, मंगेश व प्रभाकर यांनी त्यांना पायावर व कंबरेवर मारले. त्यांची आई सा. क्र. ०८ दुर्गा ही सोडवण्यासाठी आली असता तिलादेखील आरोपींनी काठीने मारले. त्यांना रंजित सावळे, रविंद्र मानेकर यांनी सा. क्र. ०१ अकिल याच्या ऑटोरिक्षामधून पोलीस स्टेशनला नेले व तेथून त्यांना कारंजा सरकारी दवाखान्यात उपचारासाठी अमरावती येथे पाठवण्यात आले. मारहाणीत वासुदेवचा पाय व अरुणचा डावा हात फ्रॅक्चर झाला होता. आरोपींनी घटनेच्यावेळी त्यांना मारहाण करण्यासाठी वापरलेल्या काठया व कुऱ्हाड या आर्टिकल–अ ते ड वरील काठया व आर्टिकल–इ वरील कुऱ्हाड असल्याचे त्यांनी ओळखले.

२०. त्यांच्या उलटतपासात असे आले आहे की, त्यांचे घर आरोपींच्या घरापासून एक घर सोडून आहे. घटनेच्यापूर्वीपासून आरोपी व त्यांचे पटत नव्हते. त्यांच्या व आरोपींच्या घरासमोर सिमेंट कॉंक्रीटचा पक्का रोड आहे व रोडच्या मध्यभागातून एक नालीदेखील आहे. सिमेंटच्या नाल्या आहे. आर्टिकल–अ ते ड वरील काठया व आर्टिकल–इ वरील कुऱ्हाड याव्यतिरीक्त ते, वासुदेव, मुक्ता व दुर्गा आरोपींसोबत वाद करण्यासाठी आरोपींच्या घरासमोर गेले होते, त्यावेळी आरोपींशी वाद करताना ते सर्व सिमेंटच्या रस्त्यावर पडल्यामुळे त्यांना दुखापती झाल्याचा, आरोपींनी त्यांना आर्टिकल–अ ते ड वरील काठया व आर्टिकल–इ वरील कुऱ्हाडीने कोणतीही मारहाण केली नसल्याचा, रंजित सावळे व राजेंद्र मानेकर यांनी त्यांना अकिल यांच्या ऑटोरिक्षामधून कारंजा येथे नेले नसल्याचे व आरोपींशी त्यांचे पटत नसल्यामुळे वासुदेवने आरोपींविरुध्द खोटा रिपोर्ट दिल्याचा आरोपींचा बचाव त्यांनी नाकारलेला आहे. सर्व आरोपींनी वासुदेवला पोलीस स्टेशनला फिर्याद का दिली असे विचारुन त्याच्याशी भांडण केले व बाबारावने अरुणचा हात फ्रॅक्चर केला हा मजकूर सदर

साक्षीदाराने प्रथमतः न्यायालयासमोर सांगितलेला आहे. सदर मजकूर त्यांच्या पोलीस जबाबात नमूद नाही.

२१. सा.क्र.०७ वासुदेव, फिर्यादी व सा. क्र. ०८ दुर्गाबाई, फिर्यादीची आई, दोघेही जखमी साक्षीदार यांच्या पुराव्यात असे आले आहे की, सात ते आठ वर्षापूर्वी रात्री ०८.०० ते ०९.०० वाजेच्या दरम्यान मोखड पिंप्री येथे त्यांच्यात व आरोपीमध्ये पाणी भरण्याच्या कारणावरुन किरकोळ बोलचाल झाली होती. याव्यतिरीक्त काही घडले नव्हते. खाली पडल्यामुळे त्यांना दुखापती झाल्या होत्या.

२२. सा. क्र. ०७ वासुदेव हे त्यांच्या जबानी रिपोर्ट/फिर्याद प्रमाणे व सा. क्र. ०८ हे त्यांच्या पुर्वीच्या पोलीस जबाबाप्रमाणे साक्ष देत नसल्याने अभियोगपक्षाने सदर साक्षीदारांची शोधक उलटतपासणी घेतली; परंतु त्यामध्ये सुध्दा या साथीदारांनी अभियोगपक्षास कोणतेही सहकार्य केले नाही. त्यामुळे या साक्षीदारांच्या साक्षीचा अभियोगपक्षाला कोणताही उपयोग होत नाही. याउलट त्यांनी त्यांच्यामधील व आरोपींमधील वाद मिटलेला असल्याचे मान्य केले.

२३. सा. क्र. ०१ शेख अखील, यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांच्याकडे ऑटोरिक्षा क्रमांक एम.एच–३७–जी–३६८६ असून ते ऑटो चालवतात. परंतु दिनांक ०८/०९/२०१७ रोजी ते गावातील चौकात शेख राजीक व रविंद्र यांच्यासोबत बसलेले असताना महेश काळे त्यांच्याकडे आल्याचे त्याने आरोपींनी वासुदेव व त्याचे आई–वडिल आणि बहिण यांना मारहाण केल्याचे सांगितल्याचे, ते ऑटो घेवून घटनेच्या ठिकाणी गेले असता त्यांना वासुदेव व अरुण सिमेंट रस्त्यावर पडलेले असल्याचे, त्या दोघांच्या डोक्यातून रक्त निघत असल्याचे, त्यांच्या पायाला व हाताला मार लागलेला असल्याचे, रंजीत सावळे व त्यांनी वासुदेव, अरुण, मुक्ता व दुर्गा यांना ऑटोत उचलून ठेवल्याचे व त्यानंतर त्यांना कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशनला नेल्याचे अभियोगपक्षाचे म्हणणे नाकारलेले आहे.

२४. सा. क्र. ०४ गणेश व सा. क्र. ०५ दिनकर, प्रत्यक्षदर्शी साक्षीदार, यांच्या पुराव्यात असे आले आहे की, त्यांना घटना कधी, कुठे व काय घडली याबाबत काही माहिती

नाही. त्यांच्यासमक्ष आरोपींनी वासुदेव, अरुण, मुक्ता व दुर्गा यांना काठयांनी व कुऱ्हाडीने मारहाण केल्याची कोणतीही घटना घडली नव्हती.

२५. सदर साक्षीदार त्यांच्या पुर्वीच्या पोलीस जबाबाप्रमाणे साक्ष देत नसल्याने अभियोगपक्षाने सदर साक्षीदारांची शोधक उलटतपासणी घेतली; परंतु त्यामध्ये सुध्दा या साथीदारांनी अभियोगपक्षास कोणतेही सहकार्य केले नाही. त्यामुळे वरील तिन्ही प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांच्या साक्षीचा अभियोगपक्षास कोणताही फायदा होत नाही.

२६. साक्षीदार क्र.०३ ज्ञानेश्वर ठाकरे, घटनास्थळ व जप्ती पंच, यांनी दिनांक ०९/०९/२०१७ रोजी पोलीसांनी आरोपी बाबाराव, प्रभाकर यांच्याकडून प्रत्येकी एक आडजात काठी, आरोपी निखील व मंगेश यांच्याकडून प्रत्येकी बांबुची एक काठी व आारोपी राजेशकडून दांडयासह एक लोखंडी कुऱ्हाड जप्त करुन त्याबाबतचे पाच जप्ती पंचनामे केल्याचे व दिनांक १०/०९/२०१७ रोजी मोखड, ता. कारंजा येथे आरोपींच्या घरासमोर घटनास्थळ पंचनामा केल्याचे नाकारलेले आहे. सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहाकार्य करत नसल्यामुळे मा. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी त्यांना उलटतपासासारखे सूचक प्रश्न विचारले. परंतु सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास कोणतेही सहकार्य केले नाही.

२७. संबंधित पोलीस स्टेशनने नि.क्र. ९५ वर दिनांक २५/०६/२०२० रोजी सदर गुन्हयाचे तपासी अधिकारी मयत झाल्याबाबतचा अहवाल दाखल केला. सदर अहवालासोबत त्यांनी तपासी अधिकारी यांच्या मृत्यु दाखल्याची छायांकित प्रत दाखल केली.

२८. सदर केसमध्ये अभियोगपक्षाच्या पुराव्यातून असे निष्पन्न होते की, फिर्यादी व आरोपी यांच्यामध्ये नळाच्या पाण्याच्या कारणावरुन वाद आहे. सा.क्र. ०२ अरुण व सा. क्र. ०६ मुक्ता यांनी आरोपींनी त्यांना व सा.क्र. ०८ दुर्गाला आर्टिकल–अ ते ड वरील काठयांनी मारहाण केल्याचे व आरोपी राजेशने फिर्यादी वासुदेव याला आर्टिकल–इ वरील कुऱ्हाडीने डोक्यात मारल्याचे सांगितलेले आहे. परंतु स्वतः फिर्यादी वासुदेव व सा.क्र. ०८ दुर्गा, जखमी यांनी आरोपींनी सा.क्र. ०२ अरुण व सा. क्र. ०६ मुक्ता व त्यांना आर्टिकल–अ ते ड वरील

काठयांनी मारहाण केल्याचे व आरोपी राजेशने फिर्यादी वासुदेव याला आर्टिकल–इ वरील कुऱ्हाडीने डोक्यात मारल्याचे नाकारलेले आहे. सा.क्र. ०१ अकील यानेदेखील त्याचे ऑटोरिक्षातून त्याने वासुदेव अरुण दुर्गा व मुक्ता यांना कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशनला नेल्याचे व तो घटनेच्या ठिकाणी पोहोचला त्यावेळी त्याला सदर साक्षीदारांना दुखापती झाल्याचे दिसल्याचे अभियोगपक्षाचे म्हणणे नाकारलेले आहे. प्रत्यक्षदर्शी साक्षीदार सा. क्र. ०४ गणेश व सा. क्र. ०५ यांनीदेखील त्यांच्यासमक्ष फिर्यादीतील नमुद घटना घडल्याचे नाकारलेले आहे.

२९. सा. क्र. ०९ यांनी साक्षीदार वासुदेव, अरुण, मुक्ता व दुर्गा यांच्या वैद्यकीय प्रमाणपत्र नि. क्र. १०२ ते १०५ मधील नमुद दुखापती या एखादी व्यक्ती टणक व कठीण पृष्ठभागावर पडल्यास होवू शकतात हा आरोपींचा बचाव मान्य केला आहे.

३०. सा. क्र. ०२ अरुण यांनी 'राजु आणि मंगेश यांनी दुर्गाला मारहाण केली' हा मजकूर व सा. क्र. ०६ मुक्ता हिने 'सर्व आरोपींनी वासुदेवला पोलीस स्टेशनला फिर्याद का दिली असे विचारुन त्याच्याशी भांडण केले व बाबारावने अरुणचा हात फ्रॅक्चर केला' हा मजकूर प्रथमतः न्यायालयासमोर सांगितलेले आहे.

३१. सा. क्र. ०३ ज्ञानेश्वर यांनी गुन्हयाबाबतच्या घटनास्थळ व आर्टिकल–अ ते ड वरील काठया व आर्टिकल–इ वरील कुऱ्हाड यांचे जप्ती पंचनामे केल्याचे नाकारलेले आहे.

३२. फौजदारी खटल्याचा हा सुवर्ण नियम आहे की, ज्यावेळी अभिलेखावरील पुरावा आरोपीने गुन्हा केलेला आहे व आरोपीने गुन्हा केलेला नाही अशा दोन्ही शक्यता दर्शवितो त्यावेळी आरोपीस सहाय्यक ठरेल असे अनुमान काढणे योग्य ठरते.

३३. प्रस्तुत केसमध्येदेखील अभिलेखावर सा. क्र. ०२ अरुण व ०६ मुक्ता यांची साक्ष वगळता इतर कोणताही पुरावा उपलब्ध नाही. सदर दोन्ही साक्षीदारांचा पुरावा वगळता महत्त्वाचे साक्षीदार फिर्यादी सा. क्र. ०७ वासुदेव व सा. क्र. ०८ दुर्गा दोन्ही जखमी साक्षीदार यांनी आरोपींनी त्यांना आर्टिकल अ ते ड वरील काठयांनी व आरोपी राजुने वासुदेवला

आर्टिकल–इ वरील कुऱ्हाडीने डोक्यावर मारल्याचे, सर्व निष्पक्ष प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी त्यांचेसमक्ष घटना घडल्याचे, आरोपींनी वासुदेव, अरुण, मुक्ता व दुर्गा यांना काठयांनी व कुऱ्हाडीने मारहाण करुन दुखापती केल्याचे नाकारलेले आहे.

३४. पंच साक्षीदाराने त्यांचेसमक्ष पोलिसांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामे केल्याचे व आर्टिकल–अ ते ड वरील काठया व आर्टिकल–इ वरील कुऱ्हाड आरोपींकडून जप्त केल्याचे नाकारलेले आहे. त्यामुळे काठया व कुऱ्हाडीचा जप्ती पंचनामा निःसंशयपणे शाबित होत नाही. अभियोगपक्षाच्या साक्षीदारांच्या पुराव्यावरुन व आरोपींच्या बचावावरुन आरोपींनी अरुण मुक्ता व दुर्गा यांना आर्टिकल अ ते ड वरील काठयांनी व आरोपी राजुने वासुदेवला आर्टिकल–इ वरील कुऱ्हाडीने डोक्यावर मारल्याबाबत अभिलेखावर निसंशय पुरावा आलेला नाही. त्यामुळे युक्तीवादाकामी वासुदेव, अरुण, दुर्गा व मुक्ता यांना नि. क्र. १०२ ते १०५ वरील वैद्यकीय प्रमाणपत्रामधील नमुद दुखापती झाल्याचे मान्य केले तरी त्या दुखापती होण्यास आरोपी कारणीभुत होते हे निःसंशयपणे शाबित होत नाही. अशा परिस्थितीत आरोपी संशयाचा फायदा मिळण्यास पात्र ठरतात.

३५. घटनेच्या वेळी आरोपींनी फिर्यादी वासुदेव व अरुण दुर्गा व मुक्ता यांना नेमकी काय शिवीगाळ केली व काय धमकी दिली याबाबत अभिलेखावर काहीएक पुरावा आलेला नाही. अशा परिस्थितीत आरोपींना भा.द.वि. कलम १४३, १४८ ३२४ व ५०६ सह कलम १४९ च्या अपराधाकामी दोषी धरता येणार नाही. सदर केसमध्ये आरोपी संशयाचा फायदा मिळणेस पात्र आहेत. सबब, मुद्दा क्र. ०१ ते ०४ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ बाबतः–</u>**

३६. अभियोगपक्ष आरोपींविरुध्द असलेला गुन्हयाचा सारांश फिर्यादी व जखमी तसेच निष्पक्ष प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी व पंच साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य न केल्यामुळे सबळ पुराव्याअभावी संशयापलिकडे सिध्द करु शकला नाही. त्यामुळे आरोपींस संशयाचा फायदा मिळणे न्यायोचित ठरते. जोपर्यंत आरोपींविरुध्द आरोप सिध्द होत नाहीत तोपर्यंत कायदा आरोपीस निरपराध समजतो. आरोपींचा तो संविधानात्मक हक्कही आहे. त्यामुळे आरोपी सदर गुन्हयातून मुक्त होण्यास पात्र आहेत.

३७. सदर गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल चार आडजात काठया व एक लोखंडी कुऱ्हाड लाकडी दांडयासह (जी. पी. क्रमांक १३/२०२२) हा मुल्यहीन व गैरउपयोगी असल्यामुळे अपील कालावधीनंतर त्याचा नियमाप्रमाणे नाश कण्याबाबत आदेश करणे योग्य होईल.

३८. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ चे पुर्ततेकामी जामीन दिलेला आहे. सबब, मुद्दा क्र.०५ करिता खालील आदेश पारीत करीत आहे.

## आ दे श

१. आरोपी क्र. १. बाबाराव मनोहर गोडसे, २. प्रभाकर मनोहर गोडसे, आरोपी क्र. ३. निखील प्रभाकर गोडसे व आरोपी क्र. ०४ मंगेश बाबाराव गोडसे व आरोपी क्र. ०५ राजेश बाबाराव गोडसे यांना भारतीय दंड विधानाचे कलम १४३, १४८ ३२४, ५०४ व ५०६ सह कलम १४९ अन्वयेच्या गुन्ह्यातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येते.

२. आरोपींचे पूर्वीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. गुन्ह्यातील जप्त मुद्देमाल चार आडजात काठया व एक लोखंडी कुऱ्हाड लाकडी दांडयासह (जी. पी. क्रमांक १३/२०२२) हा मुल्यहीन व गैरउपयोगी असल्यामुळे अपील कालावधीनंतर त्याचा नियमाप्रमाणे नाश करण्यात यावा.

४. आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७-अ चे पुर्ततेकामी दिलेले जामीन बंधपत्र खटल्याच्या न्यायनिर्णयापासून पुढील सहा महिन्यांच्या कालावधीसाठी अस्तित्वात राहिल.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला.)**

Digitally signed by PANDIT DAGU DEORE
Date: 2026.03.23 16:49:59 +0530

(**पी. डी. देवरे**)

दिनांक: १७/०३/२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,

कारंजा (लाड).

## भाग 'क'

### अ. अभियोग पक्षाचे साक्षीदार

| साक्षीदार | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| ०१ | शेख अखील अब्दुल जलील | साक्षीदार | ४६ |
| ०२ | अरुण दामोदर गोडसे | फिर्यादीचे वडिल व जखमी | ४८ |
| ०३ | ज्ञानेश्वर बापुराव ठाकरे | घटनास्थळ व जप्ती पंच | ६८ |
| ०४ | गणेश वसंतराव काळे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ७७ |
| ०५ | दिनकर हरीभाऊ गोडसे | प्रत्यक्षदर्शी साक्षीदार | ८३ |
| ०६ | मुक्ता अरुण गोडसे | फिर्यादीची बहिण व जखमी | ८७ |
| ०७ | वासुदेव अरुण गोडसे | फिर्यादी व जखमी | ९१ |
| ०८ | दुर्गाबाई अरुण गोडसे | फिर्यादीची आई व जखमी | ९४ |
| ०९ | डॉ. दिपा दयाल चव्हाण | वैद्यकिय अधिकारी | ९९ |

### ब. बचाव पक्षाचे साक्षीदार

| साक्षीदार | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

### क. न्यायालयाचे साक्षीदार

| साक्षीदार | साक्षीदाराचे नांव | पुराव्याचे स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक | निरंक |

### अ. अभियोग पक्षाचे निशाणी यादी

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १. | १०२ | सा.क्र. ०२ अरुण यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| २. | १०३ | फिर्यादीचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ३. | १०४ | सा. क्र. ०८ दुर्गा अरुण गोडसे यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ४. | १०५ | सा. क्र. ०६ मुक्ता अरुण गोडसे यांचे वैद्यकीय प्रमाणपत्र |
| ५. | १०६ व १०७ | ०१/११/२०१७ रोजीचे पत्र |
| ६. | आर्टिकल–अ ते ड | चार आडजात काठया |
| ७. | आर्टिकल–इ | एक कुऱ्हाड दांडयासह |

**ब. बचाव पक्षाची निशाणी यादी**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

**क. न्यायालयाचे निशाणी यादी**

| **अनु.क्र.** | **नि.क्र.** | **वर्णन** |
|---|---|---|
| १. | ०१ | दोषारोपपत्र |
| २. | ०२ | वकीलपत्र |
| ३. | ३१ | दोषारोप |
| ४. | ८९ | फौ.प्र.सं. कलम ३२०(२) नुसार तडजोड करणेकामी परवानगीचा अर्ज |
| ५. | ९० | मुळ फिर्यादी, साक्षीदार व आरोपी यांच्यात प्रकरण |

| | | |
|---|---|---|
| | | आपसात मिटल्याबाबत संयुक्त पुरसिस |
| ६. | ३२ ते ३६ | आरोपींचे गुन्हयाचे निवेदन |
| ७. | १०८ ते ११२ | आरोपींचे फौ.प्र.सं.क. ३१३ प्रमाणे बयाण |

**ड. वस्तु/ मुद्देमाल यादी**

| अनु.क्र. | वस्तु/ मुद्देमाल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | (जी.पी. क्रमांक १३/२०२२) | एक आडजात काठी ४० इंच |
| २. | वरीलप्रमाणे | एक आडजात काठी ४८ इंच |
| ३. | वरीलप्रमाणे | एक आडजात काठी ४५ इंच |
| ४. | वरीलप्रमाणे | एक आडजात काठी ४४ इंच |
| ५. | वरीलप्रमाणे | ३४ इंच लांबी असलेली एक लाकडी दांडयात लोखंडी कुऱ्हाड |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by PANDIT DAGU DEORE
Date: 2026.03.23 16:50:13 +0530

(**पी. डी. देवरे**)

दिनांक: १७/०३/२०२६.

न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कारंजा (लाड).

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/ Order are same word to word as per the original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno. | :- | K. A. Paraswai ( Stenographer Grade-III) |
| Court Name | :- | Jt. Civil Judge (Jr.Dn.) and J.M.F.C., Karanja. Dist. Washim. |
| Date | :- | 17/03/2026 |
| Order signed by the presiding officer on | :- | 18/03/2026 |
| Order uploaded on | :- | 23/03/2026 |